http://www.sgbauonline.com/

**AV–621**

## B.A. (Part—I) (Semester–II) Examination
## (Modern Indian Languages)
## MARATHI (Compulsory)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सुचना :—** बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतांना गृहित धरली जातील।

1. वैज्ञानिक दृष्टिकोनाच्यामागे कोणता मूल्यात्मक आशय आहे. ते सविस्तर लिहा.

**किंवा**

छत्रपती शिवरायांचा प्रजाहितदक्ष राज्यकारभार व स्त्रीविषयक समतावादी दृष्टिकोणयावर प्रकाश टाका. 16

2. 'अल्पभूधारक' पाठातून व्यक्त झालेली चिंतामण या शेतमजुराच्या शोषणाची व्यथा तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

'हत्तीचा दृष्टांत' या पाठाचा आशय तुमच्या शब्दात लिहा. 16

3. (अ) 'डोईचा पदर आला खांद्यावरती' या अभंगातून व्यक्त झालेल्या संत जनाबाईच्या विचारांचा आढावा घ्या.

**किंवा**

'नाचूं कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावूं जगीं।।' या संत नामदेवांच्या अभंगाचा आशय स्पष्ट करा. 8

(ब) निराशेला शरण जाता कामा नये ही जाणीव 'योद्धा' या कवितेतून कशी व्यक्त झाली आहे. स्पष्ट करा.

**किंवा**

'चाफा' या कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा. 8

4. (अ) कार्यालयीन पत्रव्यवहाराचे स्वरूप व वैशिष्टये स्पष्ट करा.

**किंवा**

अथर्व होलसेल डिलर, झाशी राणी चौक, नागपूर यांच्या कडे गृहपयोगी वस्तुंच्या माहितीपत्रकाची मागणी करणारे पत्र आशिष वस्तू भांडार, पंचवटी चौक, अमरावती या नावाने पाठवा. 8

(ब) अविनाश चव्हाण, गणेश नगर मलकापूर या नावाने तहसिल कार्यालय, बुलडाणा येथे लिपीक पदासाठी अर्ज लिहा.

**किंवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग लेखाधिकारी वर्ग-3 या पदाकरिता कु. मेघना देशमुख, अमरावती या नावाने स्व-परिचय पत्र तयार करा. 8

5. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा : 16

(1) स्वामी विवेकानंदांच्या मते जीवनामध्ये सगळयात जास्त गरज कशाची आहे ?

(अ) पैशाची (ब) बलाची

(क) ज्ञानाची (ड) आरोग्याची



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(2) शिवाजी राजांच्या सैन्यात घोड्याची निगा राखण्यासाठी कोणाची नेमणूक केली जात असे ?

(अ) राऊत (ब) सरदार

(क) मोद्दार (ड) घोडेस्वार

(3) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा चौथा मूल्यात्मक निकष कोणता ?

(अ) निर्भयता (ब) सहाय्यता

(क) शोधकता (ड) सत्यता

(4) गावी आलेल्या हत्तीस पहावयास कोण गेले होते ?

(अ) डोळस (ब) जात्यंध

(क) अपंग (ड) मुकबधीर

(5) चिंतामणच्या मुलीचे नाव काय होते ?

(अ) मंदा (ब) चंदा

(क) नंदा (ड) कुंदा

(6) वसंत आपल्या सोबत कोणते उत्साहपर्व घेऊन येतो ?

(अ) होळी (ब) दिवाळी

(क) दसरा (ड) पोळा

(7) भागवतधर्माची पताका पंजाबप्रांतापर्यंत नेण्याचे कार्य कोणत्या संताने केले ?

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत एकनाथ

(क) संत रामदास (ड) संत नामदेव

(8) 'डोईचा पदर आला खांद्यावरी' हा अभंग कोणी लिहिला ?

(अ) संत कान्होपात्रा (ब) संत जनाबाई

(क) संत बहिणाबाई (ड) संत सोयराबाई

(9) अर्वाचीन मराठीतील पहिली कवयित्री म्हणून कोणाला ओळखतात ?

(अ) बहिणाबाई चौधरी (ब) सावित्रीबाई फुले

(क) शांताबाई शेळके (ड) इंदिरा संत

(10) गेले आंब्याच्या वनी म्हटली मैनासवे गाणी या ओळी कोणाच्या आहेत ?

(अ) नारायण गुप्ते (ब) त्र्यंबक ठोंबरे

(क) कृष्णाजी दामले (ड) बा.भ. बोरकर

(11) 'अक्षर उत्सव' या काव्यसंग्रहाचे कवी कोण आहेत ?

(अ) नामदेव ढसाळ (ब) शिवा राऊत

(क) नारायण सुर्वे (ड) मर्ढेकर



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(12) 'योद्धा' या कवितेत कशाला शरण जाता कामा नये असे म्हटले आहे ?

(अ) वासनेला (ब) अंधकाराला

(क) निराशेला (ड) परामवाला

(13) 'हंबरून वासराले चाटते जव्हा गाय' या ओळी कोणत्या कवितेतील आहे ?

(अ) गाय (ब) माय

(क) साय (ड) काय

(14) कोणत्यावर्षी महाराष्ट्रामध्ये पावसाने ओढ घेतली ?

(अ) 1993 (ब) 1995

(क) 1997 (ड) 1999

(15) येसोंता पाटलाने चिंतामणच्या नावावर केलेल्या जमिनीच्या पट्ट्याचे नाव काय होते ?

(अ) उफाटयाची (ब) जामटयाची

(क) आंब्याची (ड) बाभळीची

(16) 'ज्ञान नाही विद्या नाही ते घेणेचि गोडी नाही' या ओळी कोणाच्या आहेत ?

(अ) सावित्रीबाई फुले (ब) महात्मा फुले

(क) विठ्ठल वाघ (ड) सुरेशभट



http://www.sgbauonline.com/